


# तेरणा, तुळजाभवानी कारखान्यांवर जप्ती

उस्मानाबाद(प्रतिनिधी): राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यातील जिल्हा सहकारी बँकेने थकबाकीदार साखर कारखान्यांविरोधात मोहिम सुरू केली असून पहिला झटका तेरणा व तुळजाभवानी साखर कारखान्यांना बसला आहे. अनुक्रमे १७८ कोटी व ८० कोटींची थकबाकी असलेल्या या कारखान्यांवर जप्ती आणण्याचा निर्णय बँकेने घेतला आहे.

जिल्ह्यातील आठ सहकारी साखर कारखान्यांनी जिल्हा बँकेचे २७६ कोटी थकवले असून यापैकी ७८ कोटी व्याजाची रक्कम आहे. तेरणा व तुळजाभवानी कारखान्यांवर बडगा उचलताच नृसिंह व शिवशक्ती कारखान्यांच्या थकबाकी वसुलीची प्रक्रियाही बँकेने सुरू केली आहे. तसेच हिंगोली जिल्ह्यातील बाराशीच हनुमान सहकारी साखर कारखान्याची ४ कोटी ४४ लाख रू. थकबाकी वसुलीसाठी अवसायांमार्फत पाठपुरावा सुरू केला आहे.

राजकीय कुरघोडी?

तेरणा साखर कारखान्यावर शिवसेना आमदार ओमराजे निंबाळकर यांचे वर्चस्व आहे. तुळजाभवानी कारखाना गेले दोन वर्षे बंद अवस्थेत आहे. गेली १० ते १५ वर्षे हा कारखाना सातत्याने मधुकर चव्हाण व नरेंद्र बोरगावकर यांच्या ताब्यात आहे. नृसिंग कारखाना शिवसेना नेते व मुंबईतील बिल्डर शंकरराव बोरकर यांच्या ताब्यात आहे. शिवशक्ती कारखान्यावर शेकाप नेत्यांची पकड आहे. जिल्हा बँकेने तेरणाला पूर्वहंगामी व साखर तारण कर्ज नाकारले. तरीही तेरणा ने बँकेशी कोणताही आर्थिक व्यवहार न ठेवता कर्जाच्या परतीची व्यवस्था करून ऊस गाळप सुरू केले.

स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213 Rgd. No.L2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ६ | अंक ९ | १ एप्रिल२०११ | किंमत ५ रुपये | पाने २०

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11

# स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

# पेयजल योजनेचे निकष शिथिल करा



खासदार शेट्टी यांची मागणी; सभागृहात मांडली पाण्यासाठीची वणवण

कोल्हापूर, ता. १५ : ग्रामीण भागात राष्ट्रीय पेयजल योजनेचे निकष शिथिल करून पिण्याचे स्वच्छ व मुबलक पाणी तातडीने द्यावे, अशी मागणी खासदार राजू शेट्टी यांनी लोकसभेत करून ग्रामविकास मंत्रालयाच्या मागण्यांवरील चर्चेत कपातीची सूचना केली. ग्रामीण भागातील सद्यस्थितीचे चित्रच त्यांनी सभागृहात मांडले.



खेडेगावातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामानाने दिल्या जाणाऱ्या सुविधांमध्ये वाढ होत नाही. शहरांसाठी नगररचना कार्यालयांमार्फत आराखडा तयार केला जातो; परंतु अनेक गावांच्या गावठाणात वाढ झालेली नाही. त्यासाठी ठोस नियोजन करावे. खेडे गावातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन तेथील जनतेला शाळा, आरोग्य सुविधा तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा व वाढीव गावठाणासहीत नवी ग्रामीण रचना उभी करावी, अशी मागणीही खासदार शेट्टी यांनी केली. केंद्र शासन शहरातील लोंढे थांबवण्यासाठी 'चला खेड्याकडे' असा सल्ला देते. शेतकऱ्यांना जागतिक स्पर्धेत उतरण्यास सांगितले जात आहे; पण त्यासाठी आवश्यक असलेल्या रस्त्यांचीही सुविधा अनेक गावांत नाही. अनेक धनगरवाडे व वस्त्यांचा जगाशी संपर्क नाही. या गावांशी संपर्क जोडण्यासाठी वनखात्याच्या नियमांमध्ये बदल करून रस्ते तयार करण्याची मागणीही त्यांनी केली पान ३ वर ▸





दिल्ली : येथे साखर निर्यात संदर्भातील निवेदन पंतप्रधान मनमोहनसिंग यांना देताना खासदारांचे शिष्टमंडळ.

# साखरेची निर्यातबंदी तातडीने उठवा

## खासदार राजू शेट्टींसह युतीच्या शिष्टमंडळाचे पंतप्रधानांना साकडे

नवी दिल्ली, ता. १६ : देशांतर्गत उत्पादन वाढल्याने आणि जागतिक बाजारात साखरेच्या किमती वाढल्यामुळे साखरेवरील निर्यातबंदी तातडीने उठवावी, अशी आग्रही मागणी भारतीय जनता पक्ष-शिवसेना खासदारांच्या शिष्टमंडळाने आज पंतप्रधानांकडे केली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टीही त्यांच्यासोबत होते. देशातील साखर उत्पादनाचा अंदाज घेऊन सरकार याबाबत लवकरच निश्चित निर्णय घेईल, असे आश्वासन पंतप्रधानांनी शिष्टमंडळाला दिले.

भाजप नेते गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज दुपारी डॉ. मनमोहन सिंग यांची संसद भवनातील त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. खासदार प्रभाकर कोरे, हरिभाऊ जावळे, ए. टी. पाटील, हरिश्चंद्र चव्हाण (भाजप) आणि गजानन बाबर व प्रताप जाधव (शिवसेना) हे शिष्टमंडळात होते. मुंडे यांनी आज सकाळी याच मागणीबाबत कृषिमंत्री शरद पवार यांच्याशीही चर्चा केली होती.

यंदाच्या हंगामात देशात साखरेचे बंपर उत्पादन होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे साखरेच्या निर्यातीवर असलेली बंदी केंद्राने न उठविल्यास किमती कोसळतील व अंतिमतः ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा फटका बसेल. त्यामुळे निर्यातबंदी उठवावी, अशी मागणी आम्ही पंतप्रधानांकडे केल्याचे श्री. मुंडे यांनी सांगितले. गतवर्षी साखरेचे उत्पादनच कमी होते. त्यामुळे निर्यात थांबविण्याचा निर्णय केंद्राने घेतला. यंदा मात्र विक्रमी साखर उत्पादनाची चिन्हे असल्याने निर्यातीवरील बंदी उठविणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

**'कांद्याचे निर्यात शुल्क कमी करा'**

कांद्यावरील निर्यात शुल्क साडेतीनशे डॉलर प्रतिटन यापेक्षाही कमी करण्याची मागणी या वेळी करण्यात आली. कांद्याचे भरघोस उत्पादन पाहता सरकारने निर्यातबंदी तातडीने उठविली; मात्र निर्यात शुल्क वाढवून ते ६०० डॉलर प्रतिटन केले होते. नंतर ते साडेतीनशे डॉलरपर्यंत खाली आणले. आजही पाकिस्तान किंवा अन्य कांदा उत्पादक देशांच्या तुलनेत भारतात कांद्यावरील निर्यात शुल्क प्रतिटन ५० ते ७५ रुपयांनी जास्तच आहे. महाराष्ट्रासह अन्य कांदा उत्पादक राज्यांतही चांगले उत्पादन झाल्याने कांदा दरात घसरण झाली आहे. ती रोखून निर्यात वाढविण्यासाठी निर्यात शुल्कात २५० ते ३०० डॉलर प्रतिटनापर्यंत कपात करणे गरजेचे आहे, असे सांगण्यात आले.





# आणि विना वॉचमन रेल्वेगेट उघडले......

कोल्हापूरः अथक प्रयत्नातून उंचगाव हद्दीतील मनाडे मळ्यानजीक असलेले विना वॉचमन रेल्वे गेट खा. राजू शेट्टी यांच्या प्रयत्नातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी महत्वाची शेतवाट खुली केल्याने शेतकरी वर्गातून आनंद व्यक्त होत आहे.

गेल्या अनेक वर्षापासून मनाडे मळ्यानजीक कार्यरत असल्याने विना वॉचमन रेल्वे गेट खात्याने बंद केले होते. मात्र फाटक बंद केल्याने शेतकऱ्यांच्या शेतीच्या रस्त्याचा मोठा प्रश्न निर्माण झालेला होता. यावर खासदार राजू शेट्टींनी रेल्वेमंत्र्यांशी पत्रव्यवहार करून सदरचे बंद रेल्वेगेट कायमचे खुले केले. यामुळे शेतकऱ्यांना शेतीचा रस्ता मोकळा झाला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवानराव काटे, माजी जिल्हाध्यक्ष बापूसो चौगुले, उंचगाव सरपंच मधुकर चव्हाण, माजी सरपंच कावजी कदम, प्रकाश पाटील, बबन निगडे, अशोक निगडे, सायबू निगडे, विठ्ठल निगडे, शामराव निगडे, बाळासो मोरे, दत्तोबा यागव, मारूती कदमं, नारायण मनाडे, बाजीराव मन्नाडे आदी उपस्थित होते.

# स्वाभिमानीच्या प्रयत्नाला यश

## सरकार घेणार २.५ लाख कोटी रूपये कर्ज

मुंबई(प्रतिनिधी): २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये, म्हणजेच एप्रिल ते सप्टेंबर या काळात सरकार २.५ लाख कोटी रूपये कर्जाऊ घेणार आहे. सरकारने पुढच्या आर्थिक वर्षासाठी अंदाज केलेल्या कर्जापैकी ही अंदाजे ६० टक्के रक्कम आहे. अशी माहिती डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक अफेअर्स चे सचिव आर. गोपालन यांनी दिली.

सरकारला कराच्या रूपात मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ झाल्याने कर्जावर अवलंबून राहण्याचे प्रमाण काहीसे कमी झाले आहे. २०१० - १२ या आर्थिक वर्षासाठी कर्जाउ घ्यायची रक्कम ४.१७ लाख कोटी रूपये इतकी असेल यापूर्वीचा अंदाज ४.४७ लाख कोटी रूपये इतका होता, असे गोपालन यांनी स्पष्ट केले.

संपूर्ण आर्थिक वर्षात सरकारने कर्जाऊ घेण्याच्या रकमेचत घट झाली तर ते खासगी क्षेत्राला फायदेशीर ठरेल, असेही गोपालन यांनी नमूद केले.

# शेतीला पुरेशी वीज द्या

**संपादकीय**

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

शेतीला १० तास वीज द्या या मागणीसाठी २८ मार्च रोजी विधानभवनावर शेतकऱ्यांच्या भव्य मोर्चा काढण्यात आला. खासदार राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांचा अंत न पाहता त्वरीत किमान १० तास वीज द्या अशी आग्रही मागणी यावेळी केली. शेतकऱ्यांच्या जीवावर मोठे होऊन अनेक आमदार निगरगट्ट झाले आहेत. सध्या विधानसभेत २८८ आमदार आहेत. नुकताच राज्य अर्थसंकल्पीय अधिवशेन झाला. यामध्ये एकाही आमदाराने वीज भारनियमनावर तोंड देखील उघडले नाही, हे विशेष. एकीकडे देशात नव्हे तर संपूर्ण जगातच अन्नधान्याची टंचाई भेडसावत असताना शेतीला पुरेशा प्रमाणात वीज देण्यात येऊ नये, ही लाजीरवाणी गोष्ट आहे. सध्याचे ऊर्जामंत्री अजित पवार यांनी शेतीला कमी नि उद्योगधंद्याला जादा अशी योजना राबवताना दिसत आहेत. शेतकऱ्यांच्या जीवावरच हे मोठे झाले आहेत. त्यामुळे त्यांना शेतकऱ्यांना किती कळवळा आहे. याचाच प्रत्यय दिसून येत आहे. स्वंतत्र शेती फिडर्सना किमान १४ तास भारनियमन करून १० तास वीज देण्यात यावी असा आदेळ २००७ साली काढण्यात आला. तरीही १४ तासावरून १६ तासावर भारनियमन करण्यात आले. सध्या उन्हाळा आहे. ४० सेल्सिअस डिग्री तापमान आहे. यामध्ये पिके तग धरून राहू शकणार नाहीत. किमान १० तास तरी वीज द्या अशी मागणी होत आहे. राज्यातील विविध पाणी पुरवठा संस्थेतील शेतकऱ्यांना ३ महिन्यातून एकदाच पाणी मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या एकरी सरासरी उत्पादनात घट होत असून यावर वेळीच उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत. विजेचा झगम गाट कशासाठी आहे. हेच कळत नाही. पंचतारांकित हॉटेल, घरे, दुकाने यांना द्यायला मुबलक वेळ आहे. वास्तविक विजेवर सर्वात अगोदर शेतकऱ्यांचाच हक्क आहे. त्यामुळे वीज पुरवठ्यामध्ये सर्वप्रथम शेतकऱ्यांनाच प्राधान्य दिले गेले पाहिजे. देशात अन्नधान्य सुरक्षा योजना राबवत आहेत. मग शेतीला वीज देण्यासाठी का टाळाटाळ केली जात हेच समजत नाही. केवळ पैश्याच्या हव्यासापोटी वउद्योगपतींचे हितसंबध जपण्यासाठी शेतकऱ्यांचा बळी दिला जात आहे.

शेतकरी संघटना स्वाभिमानी

◆ वर्ष ६ ◆ अंक ९ ◆१ एप्रिल २०११ ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक :** डॉ. महावीर अक्कोळे ◆ **सह संपादक :** डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,
◆**मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे** राळेगणसिद्धी, **न्या. पी. बी. सावंत** पुणे, **न्या.बी.जी.कोळसे पाटील** पुणे, . **प्रा. शरद पाटील** सांगली, **कुमार सप्तर्षी** पुणे, **माजी आमदार. वामनराव चटप** चंद्रपूर
◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी ◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक ✻खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

**वार्षिक वर्गणी रु. १००/-**

# पेयजल योजनेचे निकष शिथिल करा

▶ पान १ वरुन
पंचगंगा नदीच्या प्रदूषणाचा मुद्दा उपस्थित करून देशातील प्रमुख चार नद्यांपैकी एक असलेल्या या नदीचे प्रदूषण झाले आहे. इंचलकरंजी व कोल्हापूर शहरांतील औद्योगिक क्षेत्राचे सांडपाणी नदीत थेट मिसळत आहे. त्यामुळे नदी प्रदूषित झाली असून तेच पाणी ग्रामीण भागातील जनतेला प्यावे लागत आहे. परिणामी, कावीळ, गॅस्ट्रो यासारख्या साथींनी थैमान घातल्याचे निदर्शनास आणून देऊन गंगा शुद्धीकरणच्या धर्तीवर पंचगंगेचे शुद्धीकरण करावे, अशी मागणी त्यांनी केली. ग्रामीण भागातील लोकांना स्वच्छ पाणी मिळावे, यासाठी राष्ट्रीय पेयजल योजनेतील निकष शिथिल करण्यात यावेत, अशी सूचनाही त्यांनी केली.

# जपानी अन्नधान्यावर बंदी

बिजींगः किरणोत्साराचा धोका लक्षात घेऊन जपानहून आयात होणाऱ्या अन्नधान्यावर बंदी टाकण्याचा निर्णय चीन सरकारने घेतला आहे. जपानहून आलेल्या जहाज, प्रवाशांमध्ये किरणोत्साराचे गंभीर प्रमाण आढळल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

टोकियोहून झियामेन बंदरात आलेल्या मालवाहू जहाजात किरणोत्सारी धुळीचे कण आढळून आले. तसेच दाई - ईची अणुभट्टीपासून जवळच असलेल्या नागानो, साईताना येथून आलेल्या दोन जपानी प्रवाशांची तपासणी चीनमध्ये केली. त्यामुळेच हा किरणोसार काळजी वाटावी, इतक्या धोकादायक पातळीचा असल्याचे आढळून आले. त्यामुळेच अन्नधान्यांच्या आयातीवर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.









# खेड्यांचा विकास करा

## खासदार राजू शेट्टी यांची मागणी

नवी दिल्ली : खेडे गावांची लोकसंख्या वाढत चाललेली आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येवर खेड्यामध्ये काही सुविधा वाढत नाही. शहरासाठी नगर रचना कार्यालयामार्फत आराखडा तयार केला जातो. परंतु खेड्यागावात मात्र गेल्या अनेक वर्षापासून गावठाणाच्या हद्दीत वाढ झालेली नाही.यामध्ये ठोस नियोजनाचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. मा. मंत्रीमहोदय, विलासरावजी देशमुख हे बाभूळ गावचे सरपंच ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तर आता देशाचे ग्राम विकास मंत्री इथंपर्यंत प्रवास करून आलेले आहेत. त्यांना गांवाच्या समस्यांची माहिती आहे. त्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी खेड्याची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन खेड्यातील जनतेला शाळा, आरोग्य सुविधा पीक पाण्याच्या सुविधा व वाढीव गावठाणासहीत एक नवी ग्रामीण रचना उभी करावी जेणेकरून खेड्याचाही विकास होईल. खेड्यातील रस्त्यांची अवस्था अतिशय बिकट आहेत. बदलत्या काळानुसार शेतीतही अनेक बदल होत आहेत. शेतकऱ्याला बैलगाडी ऐवजी आता ट्रक व ट्रॅक्टर शेतापर्यंत न्यावयासच लागतो. सरकार शेतकऱ्यांना एकीकडे जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेत उतरायला सल्ला देत आहे. तर दुसरीकडे शेतकरी आपल्या शेतापर्यंत पोहचू शकत नाही. तो बाजारपेठेपर्यंत कसा पोहचणार? यासाठी शेतापर्यंत जोडणाऱ्या रस्त्यांची आवश्यकता आहे. तसेच डोंगरी भागात महाराष्ट्राच्या पश्चिम घाटाच्या शाहूवाडी, पन्हाळा, शिराळा सारख्या डोंगरी भागात जंगलात असणारे धनगरवाडे व दुर्गम भागातील लोक वाड्यावस्त्या व तांड्यातून राहतात. या छोट्या गावांची लोकसंख्या २०० ते ३०० इतकी असते. वर्षानुवर्षे या गावांचा जगाशी संपर्क नाही. आरोग्याच्या सुविधा नाहीत. या गावांना जोडणारे रस्ते तयार करण्यासाठी निकष शिथील करण्याबरोबरच वनखात्याच्या नियमांमध्ये बदल करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

माझ्या मतदारसंघामध्ये पंचगंगा नदी आहे. जी देशातील ४ प्रमुख नद्यांपैकी एक आहे. इचलकरंजी व कोल्हापूर शहरातील व औद्योगिक क्षेत्राचे सांडपाणी नदीत थेट सोडल्यामुळे नदी प्रदूषित झालेली आहे. व हेच प्रदुषित पाणी खेड्यातील नदी काठच्या लोकांना प्यावे लागत आहे. त्यामुळे कावीळ, गॅस्ट्रो सारख्या साथींनी या परिसरात अक्षरशः थैमान घातले आहे. गंगा शुध्दीकरणासाठी केंद्र सरकारने करोडो रूपये खर्च केलेले आहेत. त्याच धर्तीवर पंचगंगेच्या शुध्दीकरणाची आवश्यकता आहे. तसेत या परिसराला गावांना राष्ट्रीय पेयजलातील निकष शिथिल करून पिकाचे पाणी तातडीने उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

# 'यूएलसी'ची जमीन शेतकऱ्यांच्या नावावर

## महिन्यात घरपोच सात-बारा देण्याची मंत्र्यांची घोषणा

मुंबई, ता. २२ : राज्यात नागरी कमाल जमीन धारणा कायदा रद्द झाल्यानंतरही शेतकऱ्यांच्या 'सात-बारा'वर यूएलसीमधील जमीन नोंदणी होत नसल्याच्या लक्षवेधीने आज विधानसभेत सरकारला धारेवर धरले. आमदार गणपत गायकवाड यांनी मांडलेल्या या लक्षवेधीला नगरविकास राज्यमंत्री सचिन अहिर यांनी सकारात्मक उत्तर दिले. एका महिन्यात यूएलसी कायद्याने सरकारची नोंद असलेले सात-बारा रद्द करून या जमिनी शेतकऱ्यांच्या नावे केल्या जातील, अशी घोषणा त्यांनी विधानसभेत केली.

राज्य सरकारने नागरी कमाल जमीन धारणा कायदा २००७ मध्ये रद्द केला, त्यामुळे राज्य अतिरिक्त जमीन यूएलसीखाली येत असल्याने लाखो शेतकऱ्यांच्या सात-बारावर राज्य सरकारची नोंद होती. या नोंदींमुळे शेतकऱ्यांना या जमिनींचे व्यवहार करता येत नाहीत. त्यांना बँकांकडून कर्ज उपलब्ध होण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे या जमिनी 'यूएलसी'च्या नोंदीतून काढून शेतकऱ्यांच्या नावे कराव्यात, अशी मागणी आमदार गायकवाड यांनी केली. या मागणीचे आमदार शशिकांत शिंदे यांनी जोरदार समर्थन केले.

आमदारांच्या आग्रही मागणीचा आदर करीत राज्यमंत्री सचिन अहिर यांनी यूएलसीअंतर्गत अधिगृहीत झालेल्या सर्व जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करण्यात येतील असे स्पष्ट केले. राज्य सरकारची नोंद वगळून नव्याने तयार करण्यात येणारे सात-बारा संबंधित शेतकऱ्यांना महिन्यात घरपोच करण्यात येतील अशी घोषणाही त्यांनी केली.


**श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर**

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वतःचे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

**श्री. व्ही. बी. हुग्गे.**
बी. ए. बी. कॉम.
चिफ एक्झि ऑफिसर

**श्री. अशोक शां रूणवाळ.**
बी. कॉम
व्हा. चेअरमन
व सर्व संचालक

**पै. विठ्ठल बाबूराव मोरे**
एम. ए.
चेअरमन

# सहकारीला कारखान्यांना लागतोय खासगीकरणाचा 'व्हायरस'

## सहकारातील ३५ कारखाने विक्रीच्या वाटेवर

पुणे, ता. २५ : सहकाराची पंढरी असलेल्या महाराष्ट्रात खासगी साखर कारखान्यांचे पीक जोमात येत असून, सहकारी साखर कारखान्यांपेक्षा खासगी कारखान्यांची नोंद आता जास्त झाली आहे. खासगी कारखान्यांचे सुमारे २५० अधिक प्रस्ताव साखर आयुक्तालयात दाखल झाले आहेत. एक हजार जणांनी 'ईआयएम' घेऊन खासगी कारखान्यांसाठी नोंदणी केली आहे.

साखर आयुक्तालयाने आतापर्यंत ५० कारखान्यांना मंजुरी दिली आहे. ३८ खासगी कारखान्यांची उभारणी पूर्ण होऊन त्यांनी यंदा गाळपही घेतले आहे. या ३८ पैकी जवळपास ३० कारखाने हे थेट राजकीय नेत्यांचे आहेत. उर्वरित खासगी कारखानदारांनाही राजकीय आश्रय आहेच. राज्यातील खासगी कारखाने संपवून सहकारी कारखाने निघाले. आता पुन्हा उलटे चक्र सुरू झाले आहे. राज्यात १८० सहकारी साखर कारखाने होते. ही संख्या घटून १४५ वर आली आहे. उर्वरित बंद असलेले कारखाने खासगी व्यक्तींना विकत घेण्यासाठी राज्य सरकारने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात सवलतींची घोषणाही केली. त्यामुळे बंद असलेले ३५ सहकारी साखर कारखानेही आता विक्रीला उपलब्ध झाले आहेत. हे कारखाने खरेदी करणाऱ्यांना आता विविध करांत सवलत देण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

साखर कारखानदार होणे झाले सोपे

साखर उद्योग नियंत्रणमुक्त झाल्यानंतर कोणत्याही अटींची आता पूर्तता करावी लागत नाही. 'इंडस्ट्रिअल आंत्र्यप्युनरशिप मेमोरंडम' (ईआयएम) हे प्रमाणपत्र पाच हजार रुपयांत घेतले की कोणीही साखर कारखाना टाकू शकतो. त्यासाठी साखर आयुक्तालयाकडून केवळ एक 'ना हरकत प्रमाणपत्र' घ्यावे लागते. अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्यांच्या १५ किलोमीटरच्या हद्दीत नवीन कारखाना नसल्याचे प्रमाणपत्र घेतले, की कारखाना उभारणीचा मार्ग मोकळा होतो. आतापर्यंत किमान एक हजार जणांनी 'ईआयएम' घेतले आहे. त्यापैकी २५० जणांना साखर आयुक्तालयात प्रस्ताव दाखल केले आहेत.

मात्र, नवीन कारखाना सुरू करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्यापासून किमान १५ किलोमीटरचे हवाई अंतर असणे आवश्यक आहे. या अंतरामुळे कारखाने मोठ्या संख्येने उभे राहत आहेत. या संख्येवर निर्बंध आणण्यासाठी ही मर्यादा २५ किलोमीटरपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. पंजाब व हरियाना या दोन राज्यांनी हे अंतर ४० किलोमीटर करण्याची सूचना केली आहे. याबाबत केंद्र निर्णय घेणार असून, सर्व राज्यांच्या यावर सूचना मागविण्यात आल्या आहेत.

राज्यात पाण्याची वाढती उपलब्धता, त्यामुळे उसाखालील वाढलेले क्षेत्र, साखरेचे चढे भाव यामुळे खासगी गुंतवणूकदारांना साखर उद्योग आकर्षित करत आहेत. याशिवाय इथेनॉल आणि सहवीजनिर्मितीचा बोनस मिळत असल्याने ही गुंतवणूक चांगला परतावा देणारी ठरत असल्याचे या क्षेत्रातील उद्योजकांनी सांगितले.

याबाबत नॅचरल शुगरचे बी. बी. ठोंबरे म्हणाले, की २५०० हजार टन प्रतिदिन गाळप क्षमता असलेला एक कारखाना उभारण्यासाठी सुमारे ४० कोटी रुपयांपर्यंत खर्च येतो. मात्र, यासोबत सहवीजनिर्मिती आणि इथेनॉलचे उत्पादन घेतले तर ही गुंतवणूक शंभर कोटी रुपयांपर्यंत करावी लागते. सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल सक्तीचे केले आहे. त्यामुळे त्यातूनही चांगले उत्पन्न मिळते. सहवीजनिर्मितीसाठी सरकार वेगवेगळ्या प्रकारचे अनुदान देते. त्यामुळे ही वीजनिर्मिती कारखान्यांना चांगले उत्पन्न मिळवून देते. परिणामी अनेक नेते, उद्योजक यांनी यात गुंतवणूक केली आहे. सहकारी साखर कारखान्यांत व्यावसायिकतेचा अभाव असतो. साखर विक्रीचे, साहित्य खरेदीचे निर्णय सक्षमतेने घ्यावे लागतात. त्याचा अभाव सहकारात असल्याने अनेकांनी खासगी कारखाने सुरू केले.

नेत्यांना ओढ साखरेची

राज्यात सर्वाधिक क्षमतेचा ७५०० टन प्रतिदिन गाळप असलेला कारखाना बबनराव पाचपुते यांनी उभारला आहे. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे असलेल्या ११ कारखान्यांतून रोज २५ हजार टन उसाचे गाळप होते. नितीन गडकरींनी विदर्भात तीन खासगी कारखान्यांची मुहूर्तमेढ रोवली आहे. पुण्यात अजित पवार यांनी दौंड शुगर फॅक्टरी उभारली आहे.

पान ७ वर ▶




इस्लामपूर : थ्री जी मोबाईल सेवेच्या प्रारंभप्रसंगी खासदार राजू शेट्टी यांनी मार्गदर्शन केले.

# इस्लामपुरात बीएसएनएलच्या थ्री जी सेवेला सुरवात

इस्लामपूर, ता. २६ : बीएसएनएलच्या थ्री जी सेवेमुळे लोकांचा वेळ व पैसा वाचणार आहे. या सेवेमुळे आपण नवीन पर्वात प्रवेश करत आहोत. याचा मानवी जीवनाच्या प्रगतीसाठी उपयोग व्हावा, असे मत खासदार राजू शेट्टी यांनी आज व्यक्त केले.

उरुण इस्लामपूर नगरपरिषद क्षेत्रात थ्रीजी मोबाईल सेवेचा प्रारंभ खासदार शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. दूरसंचारचे सांगली विभागाचे वरिष्ठ महाप्रबंधक कमलकुमार सक्सेना, उपमहाप्रबंधक के. व्ही. राव, एस. बालकुमार, स्वाभीमानीचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत, जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील, राजारामबापू बँकेचे अध्यक्ष शामराव पाटील प्रमुख उपस्थित होते. खासदार शेट्टी म्हणाले, ''काळ बदलला तसे विज्ञानानेही मोठी झेप घेतली आहे. सध्या लोकांकडे पैसा आहे; परंतु वेळ नाही. थ्रीजी सेवेमुळे लोकांचा वेळ व पैसा दोन्ही वाचणार आहे; तसेच प्रत्येक क्षेत्रातील माहिती लोकांना मोबाईलवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ही सेवा आता लोकांसाठी पर्वणी ठरणार आहे.''

वरिष्ठ महाप्रबंधक कमलकुमार यांनी या सेवेबद्दल उपस्थितांना माहिती दिली. या वेळी शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अस्लम पटेल यांनी सूत्रसंचालन केले. एस. एम. सूर्यवंशी यांनी आभार मानले.

# कृषिमूल्य आयोगाला स्वायत्तता मिळावी

## राजू शेट्टी : संसदेत खासगी विधेयक मांडले

इस्लामपूर, ता. १३ : केंद्र सरकारच्या अखत्यारित असलेल्या कृषिमूल्य आयोगाला निवडणूक आयोगाप्रमाणे स्वतंत्र वैधानिक मान्यता व स्वायत्तता मिळावी, यासाठी संसदेत आपण खासगी विधेयक मांडल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांनी दिली.

ते म्हणाले, ''शेतीचा उत्पादन खर्च, शेतमालाला दर याबाबत विचार करणाऱ्या कृषिमूल्य आयोगाला सध्या स्वायत्तता नाही. आयोगाला शिफारशी करण्याचे अधिकार आहेत. मात्र, या शिफारशी जशाच्या तशा स्वीकारणे सरकारवर बंधनकारक नाही. त्यामुळे आयोगाच्या शिफारशींना महत्त्व राहत नाही. आपल्या देशात निवडणूक आयोग स्वायत्त व स्वतंत्र आहे. याच धर्तीवर कृषिमूल्य आयोगाची रचना हवी. यासाठी आपण खासगी विधेयक मांडले आहे. आता संसदेला या विधेयकावर चर्चा करावीच लागेल. आयोगाला स्वतंत्र अस्तित्व व स्थान मिळाल्यास



शेतीमालाचा उत्पादन खर्च काढताना शेतीवर राबणाऱ्या कुटुंबातील सदस्यांचे श्रम देखील मोजता येतील. या श्रमाचा उत्पादन खर्चात समावेश करता येईल. या खाजगी विधेयकामुळे संसदेला शेती, शेतकरी आणि उत्पादन खर्चावर आधारित शेतमालाला भाव या मुद्यावर चर्चा करावीच लागेल.''

ते म्हणाले, ''पाच राज्यांतील विधानसभांच्या निवडणुकांत १७३ हून अधिक खासदार व्यस्त राहणार असल्यामुळे २५ मार्चच्या दरम्यान अधिवेशन संपेल. जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुकीसाठी शेतकरी संघटनेने सत्तारूढ गटाच्या विरोधी शक्तींचे एकत्रीकरण करायला सुरवात केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांत शेतकऱ्यांचे जास्तीत जास्त प्रतिनिधी निवडून जातील. यासाठी विरोधी गटांची मोट बांधायला सुरवात केली आहे. रामदेवबाबा यांच्या समर्थकांशी चर्चा सुरू आहे. भ्रष्टाचारी व्यवस्थेला सामान्य लोक कंटाळले आहेत. त्यांना बदल हवा आहे. आम्ही पर्याय देऊ. ''

खासदार शेट्टी म्हणाले, ''संसदीय आयुधांचा प्रभावी वापर केला तर अनेक प्रश्न मार्गी लागतात. सांगली जिल्हाधिकाऱ्यांनी शेती कर्जे देण्याबाबत राष्ट्रीयीकृत बँका टाळाटाळ करतात, अशी रिझर्व्ह बँकेकडे तक्रार केली होती. आपण अतारांकित प्रश्न विचारल्यावर सरकारने अशी तक्रार आली नाही, असे लेखी उत्तर दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या तक्रारीची प्रत सभापतींकडे सादर केल्यावर अर्थमंत्री प्रणव मुखर्जी चकित झाले.''

---

# सहकारी कारखान्यांना लागतोय खासगीकरणाचा 'व्हायरस'

▶ पान ५ वरुन

सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनीही खासगी कारखाना उभारण्यास सुरवात केली आहे. साखर संघाचे अध्यक्ष विजयसिंह मोहिते-पाटील हेदेखील यात मागे नाहीत. सहकारी साखर संघाचे अध्यक्ष विनय कोरे यांनी बंद पडलेले सहकारी कारखाने भाड्याने चालविण्याचा पॅटर्न राबविला आहे. मंत्री पतंगराव कदम यांचे बंधू मोहनराव, व्याही प्रतापशेठ साळुंखे यांच्या भागीदारीने उदगीर शुगर नावाने खासगी कारखान्याची घोषणा केली आहे. पुढील वर्षी पहिला हंगाम ते घेणार आहेत. याशिवाय पतंगराव कदम यांनी लवंगा-मोरबगी (जत), डफळापूर येथे दोन खासगी कारखान्यांची घोषणा केली आहे. पतंगरावांचे विरोधक माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांनीही चार कारखान्यांची घोषणा केली आहे. गुजरवाडी (कोरेगाव), गोपूज (सातारा), चंदगड (कोल्हापूर), नेवासा (नगर) येथे हे कारखाने उभारले जातील.

# पाच लाख टन साखर निर्यातीला केंद्राची मंजुरी

नवी दिल्ली, ता. २२ : केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अन्नविषयक मंत्रिगटाने आज पाच लाख टन साखरेच्या निर्यातीला परवानगी दिली. साखर कारखान्यांकडे असलेल्या शिलकी साठ्यातून ही निर्यात केली जाईल. या संदर्भात कृषिमंत्री शरद पवार यांनी केलेल्या निर्णयाला दिलेली स्थगिती या निर्णयामुळे उठविली गेली आहे. पवार यांनी अर्थमंत्र्यांना पत्र लिहून साखर निर्यातीवरील बंदी उठविण्याची मागणी केली होती.

देशांतर्गत प्रचंड उत्पादन व आधीचा शिलकी साठा यामुळे साखरेचे दर घसरले आहेत. साखरेच्या उत्पादनमूल्यापेक्षाही साखरेचे भाव खाली जाऊ लागल्याने साखर उद्योगापुढे गंभीर संकट निर्माण झाले. परिस्थिती अशीच राहिली असती तर ऊस उत्पादकांना त्यांच्या उसाची किंमत चुकती करणे साखर कारखान्यांना अशक्य होईल. योग्य भाव मिळत नसल्याने ऊस उत्पादकांचा पुढील हंगामात उसाऐवजी अन्य पिके घेण्याकडे कल वाढला असता. त्यातून उसाचे आणि परिणामी साखरेचे उत्पादन घटण्याची शक्यता निर्माण झाली असती. यामुळे पुन्हा साखर महागली असती.

साखरेच्या निर्यातीबद्दल आताच निर्णय करण्यामागे आंतरराष्ट्रीय बाजारात सध्या मिळत असलेला चांगला भाव हेसुद्धा कारण देण्यात आले. कारण ब्राझीलची साखर एप्रिलमध्ये आंतरराष्ट्रीय बाजारात येत असते. ती आल्यानंतर सध्या मिळणारा चांगला भाव भारतीय साखरेला मिळू शकला नसता. त्यामुळे याबाबत आत्ताच निर्णय करणे आवश्यक होते. तो निर्णय आज झाला.



## ...तर शेतकऱ्यांना प्रतिटन अडीचशे रुपये जादा : शेट्टी

केंद्र सरकारने पाच लाख टन साखरेच्या निर्यातीला आज परवानगी दिली. या निर्णयाचे स्वागत करताना खासदार राजू शेट्टी म्हणाले, ''तीस एप्रिलपूर्वी केंद्र सरकारने ३० लाख टन साखर निर्यातीला परवानगी द्यावी, अशी आमची मागणी आहे. गेल्या आठवड्यात माझ्यासह दहा खासदारांचे शिष्टमंडळ साखर निर्यातीला परवानगी मिळावी, यासाठी पंतप्रधान मनमोहनसिंग यांना भेटले होते. यानुसार केंद्रीय मंत्री समितीच्या बैठकीत आज झालेल्या निर्णयाचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने स्वागत करतो. मात्र, ३० एप्रिलपूर्वी आणखी ३० लाख टन साखर निर्यातीला परवानगी दिल्यास आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील साखरेच्या चढ्या भावाने शेतकऱ्यांना प्रतिटन किमान २५० ते ३०० रुपये जादा दर मिळेल.''





**आपल्या वेळेचं राजकारण खूपच साधं होतं! स्टींग ऑपरेशन, विकिलीक्स वगैरे भानगडी नसल्याने अनेक गैरव्यवहार आपण सरपणानेच करायचो!!**



**तुमच्या गावासाठी १४ हजार रुपये मी नक्की मंजूर करून घेईन, मग भले त्यासाठी शासनाला १९८ कोटी रुपये खर्च आला तरी चालेल!!**

# कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना

मुंबई, ता. २३ : राज्याची बिघडलेली आर्थिक घडी बसविण्यासाठी शिस्तीचा बडगा दाखविणारी 'दादा'गिरी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आपल्या पहिल्याच अर्थसंकल्पातून दाखवून दिली. १९१०-११ मध्ये करसंकलनात लक्षणीय वाढ साधलेल्या अजितदादांनी येत्या वर्षासाठी तब्बल एक हजार कोटी रुपयांच्या जादा करसंकलनाचा संकल्प सोडला असून 'अर्थसंकल्पात जे मांडले, ते येत्या वर्षात घडवणारच', असा निर्धार व्यक्त केला आहे.

कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना, वीजनिर्मितीवर भर, शिक्षण, आरोग्य क्षेत्रासाठी भरीव तरतूद, कर्जावरील व्याज सवलतीच्या व थकित वीज बिलावरील व्याजमाफीच्या योजनेतून शेतकऱ्यांना; तर जीवनावश्यक वस्तूंवरील करसवलती कायम ठेवून सामान्य व मध्यम वर्गाला दिलासा देणारा राज्याचा २०११-१२चा अर्थसंकल्प त्यांनी विधानसभेत सादर केला. कर्जाचा डोंगर वाढला असूनही मद्य व शीतपेयांवर करवाढ करून आणि भांडवली बाजारातील व्यवहारावरील मुद्रांक शुल्क समान दराने आकारून, महसुलातील वाढ धरून ५८ कोटी रुपयांची शिल्लक अर्थसंकल्पात दाखविण्यात आली आहे. मात्र, हा अर्थसंकल्प सादर होताना विरोधी पक्षांनी गोंधळ घालून नव्या सरकारच्या पहिल्याच अर्थसंकल्पात अडथळे आणले. अर्थ व नियोजन राज्यमंत्री राजेंद्र मुळक यांनी विधान परिषदेत अर्थसंकल्प सादर केला.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील नव्या आघाडी सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचाही हा पहिलाच अर्थसंकल्प. संजय गांधी निराधार योजनेच्या समितीचे अध्यक्षपद आमदारांकडे असावे, अशी मागणी करीत विरोधी पक्षांनी विधानसभेत आज सकाळपासूनच प्रचंड गोंधळ घातला. विरोधकांच्या गदारोळात अजित पवार यांनी



अर्थसंकल्प २०११

कुठेही न थांबता, घोषणाबाजीला छेद घेत खणखणीत आवाजात सुमारे सव्वा तास अर्थसंकल्पाचे वाचन करून राज्याचा हा अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला.

मुदतीत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयापर्यंत शून्य टक्के दराने कर्ज पुरवठा व त्यापुढे तीन लाखापर्यंत केवळ दोन टक्के व्यदराने कर्ज पुरवठा करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. कृषी पंपांच्या वीज बिलाची थकबाकी पूर्णपणे भरल्यास त्यावरील व्याज व विलंब आकाराची २ हजार ९८९ कोटी रुपयांची रक्कम माफ करण्याची कृषी संजीवनी योजना जाहीर करण्यात आली आहे. सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी जलसंपदा विभागासाठी ७ हजार ३९३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यात पाटबंधारे प्रकल्पांसाठी ६ हजार ३०० कोटी रुपयांचा समावेश आहे. चालू वर्षात १५० पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. राज्याच्या रस्तेविकासासाठी २ हजार ७४९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नवीन वीजनिर्मितीसाठी १ हजार ५०० कोटी रुपये देण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्रातील गुंतवणूक व रोजगार

निर्मितीवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. लघु, मध्यम, मोठ्या व विशाल प्रकल्पांसाठी सामूहिक प्रोत्साहनाकरिता ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जानेवारी २०११ पर्यंत १६९ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून, त्यात १ लाख ४४ हजार ५५६ कोटी रुपयांची गुंतवणूक व २ लाख १५ हजार लोकांना रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्तरावर एक्स-रे, ईसीजी, रक्तपेढी या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. विविध रुग्णालयांच्या प्रयोगशाळा, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी विविध सुविधांमध्ये वाढ, त्यासाठी २४ कोटी रुपयांची व आरोग्य संस्थांच्या बांधकामांसाठी २४१ कोटी ९५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले. केंद्र सरकारच्या शिक्षणाच्या हक्काच्या कायद्याची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अर्थसंकल्पात सर्वशिक्षा अभियानांतर्गत राज्याच्या हिश्श्या

पोटी ७८० कोटी रुपये आणि राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत विविध कार्यक्रम हाती घेण्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुंबईच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. मुंबईत टप्प्याटप्प्याने बीओटी तत्त्वावर ५ हजार सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. गेट वे ऑफ इंडिया येथे प्रवाशांसाठी तरंगती जेटी सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, कोल्हापूर-महालक्ष्मी शक्तीपीठ इत्यादी तीर्थक्षेत्र विकासासाठी १७५ कोटी रुपये देण्याचे जाहीर करण्यात आले. विमुक्त जाती व भटक्या जमाती समाज घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेची घोषणा अजित पवार यांनी केली. या योजनेंतर्गत दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना जमीन उपलब्ध करुन घरे बांधून दिली जाणार आहेत. त्यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात

पान १० वर ▶

# कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना

▶ पान ९ वरुन

तांदूळ, गहू, डाळी व त्यांचे पीठ, मिरची, गूळ, हळद, चिंच, नारळ, धणे, पापड, खजूर, सोलापुरी चादर, टॉवेल या जीवनावश्यक वस्तूंवरील करमाफीला ३१ मार्च २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच उपाहारगृहात मिळणाऱ्या वडा-पाववरील कर साडेबारा टक्क्यांवरुन पाच टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. मनुका, बेदाणा व काजूबरोबरच आता इतर सुका मेव्यावरील साडेबारा टक्के कर कमी करून तो पाच टक्के करण्यात आला आहे. या करसवलतीमुळे सामान्य माणूस व मध्यमवर्गियांना दिलासा मिळणार आहे.

राज्यातील साखर कारखान्यांकडून गोळा करण्यात येणारा ऊस खरेदी कर हा दर महिन्याला होणाऱ्या साखर विक्रीतून वसूल करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच आजारी साखर कारखान्यांच्या पुनरुज्जीवन कार्यक्रमांतर्गत कारखान्यांकडे असलेली विक्री कराची व उस खरेदी कराची थकित मूळ रक्कम ही एकरकमी भरल्यास दंड व व्याज माफ करण्याची घोषणा पवार यांनी केली.

देशी व विदेशी मद्यासह गॉगल्स, शितपेये यांच्यावरील करात वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे मद्य व शितपेये महागणार आहेत. शेअर, रोखे व वस्तुवायदे बाजाराच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारावर ०.००५ टक्के या समान दराने मुद्रांक शुल्क आकारले जाणार आहे. या करवाढीतून राज्याला एक हजार कोटी रुपयांचा जादा महसूल मिळणे अपेक्षित धरण्यात आले आहे.

## राज्याची योजना ४१ हजार कोटींची

राज्याची २०११-१२ च्या वार्षिक योजनचे आकारमान ४१ हजार ५०० कोटी रुपयांचे ठरविण्यात आले आहे. परंतु मात्र त्याला अजून केंद्रीय योजना आयोगाची मान्यता मिळायची आहे. त्यातील ४ हजार २३३ कोटी रुपये एवढी रक्कम अनुसूचित जातीसाठी व ३ हजार ६९३ कोटी ५० लाख रुपये अनुसूचित जमाती उपयोजनेसाठी प्रस्तावित करण्यात आली आहे. जिल्हा सर्वसाधारण योजनेसाठी ४ हजार ३१९ कोटी ५० लाख एवढी तरतूद करण्यात आली असून मागील वर्षाच्या तुलनेत त्यात ५०० कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

## कर्जाचा डोंगर वाढतोच आहे

राज्याच्या २०१०-११ च्या अर्थसंकल्पातील सुधारीत अंदाजानुसार राज्यावर २ लाख ५ हजार ६६८ कोटी ६९ लाख रुपये कर्जाचा बोजा दाखविण्यात आला आहे. तर २०११-१२ या वर्षात २ लाख २६ हजार ९२६ कोटी ४८ लाख रुपये कर्ज असेल असे अंदाजित करण्यात आले आहे. म्हणजे सुमारे २० हजार कोटी रुपयांनी कर्जाचा डोंगर वाढला आहे.

गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात ९७ हजार ४३ कोटी महसुली जमा अपेक्षित होती. सुधारीत अंदाजानुसार १ लाख ७ हजार १५९ कोटी रुपये एवढी महसुली जमा निश्चित करण्यात आली आहे. वर्षाच्या सुरुवातीस एक लाख ४ हजार ६९८ कोटी रुपये महसुली खर्च अपेक्षित धरला होता. सुधारीत अंदाजात हा खर्च एक लाख १२ हजार ८४६ कोटी रुपये इतका निश्चित केला आहे. परिणामी वर्षाच्या सुरुवातीस अपेक्षित रुपये ७ हजार ६५४ कोटी रुपयांची महसुली तूट काही प्रमाणात कमी होऊन ती ५ हजार ६८८ कोटी इतकी खाली आली आहे. या अर्थसंकल्पात २०११-१२ या वर्षाचे महसुली उत्पन्न १लाख २१ हजार ५०३ कोटी रुपये अपेक्षित धरण्यात आले आहे. तर १ लाख २१ हजार ४४५ कोटी रुपये महसुली खर्च अंदाजित करण्यात आला आहे. त्यानुसार महसुली तूट पूर्णपणे भरून निघून ५८ कोटी रुपयांचे महसुली अधिक्य अपेक्षित असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

## महाराष्ट्र कर्जबाजारी नं. २

मुंबई (प्रतिनिधी) : महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक प्रगत राज्य असल्याचा डांगोरा सत्ताधारी पिटत आहेत. विशेषतः सर्व तऱ्हेचे उद्योग आजही गुजरातपेक्षा महाराष्ट्रालाच पसंती गेत असल्याचे आवर्जुन सांगण्यात येते. प्रत्यक्षात आज राज्यावर थोडे थोडके नव्हे तर तब्बल २ लाख ३१ हजार कोटी रूपयांचे कर्ज असल्याची कबुली अर्थमंत्री अजित पवार यांनीच दिली.

कर्जाचा यापेक्षा मोठा डोंगर फक्त उत्तर प्रदेशच्याच डोक्यावर आहे. यातही वाईट गोष्ट म्हणजे यातील ६५ हजार कोटींचे कर्ज खुल्या बाजारातून विकत घेण्यात आलेले आहेत. एकीकडे राज्यात वाहनांचा महापूर आलेला आहे. मोबाईल फोन्सची घनता १०० टक्क्यांच्या दिशेने आगेकूच करते आहे. तर दुसरीकडे दिवसेंदिवस वीजेचे भारनियमन वाढत चालले आहे, अर्थात दरवर्षी विजेविना रहावे लागणार यांची संख्या वाढतच चालली आहे. गेल्यावर्षी उत्तम पाऊस झाल्याने कृषी उत्पन्नातही घसघशीत १२.५ टक्के वाढ होण्याची अपेक्षा आहे. उद्योग क्षेत्रातही ९ टक्के वाढ होण्याची चिन्हे असून एकंदरीत विकासाचा वेग १०.५ टक्क्यांवर पोहोचेल, असे चित्र आहे.

१) राज्याचा कर्ज काढून विकास
२) वीजनिर्मिती कमी, भारनियमनात वाढ
३) मोबाईलधारक ८.६३ कोटी, लॅण्डलाईनला उतरती कळा
४) दर लाख लोकांमागे १२,८४६ वाहनेस रूग्णवाहिका फक्त आठ
५) वेतन, पेन्शन आणि कर्जफेडीवरच ७० टक्के खर्च
६) कृषी उत्पन्नात १२.५ टक्के वाढ

# राज्य अर्थसंकल्प २०११-१२ ठळक वैशिष्ट्ये

## राज्याच्या महसुलात लक्षणीय वाढ

- ❖ २००९-१० मध्ये महसुली जमा रुपये ८६ हजार ९१० कोटी.
- ❖ २०१०-११ मध्ये महसुली जमा रुपये एक लक्ष सात हजार १५९ कोटी एकूण वाढ २३.३ टक्के.
- ❖ २००९-१० च्या तुलनेत विक्रीकर संकलनात २०१०-११ मध्ये २६ टक्के वाढ.
- ❖ २००९-१० च्या तुलनेत मुद्रांक शुल्कात २०१०-११ मध्ये ३१ टक्के वाढ.
- ❖ २०११-१२ मध्ये अपेक्षित महसूल एक लक्ष २१ हजार ५०३ कोटी.
- ❖ उत्पादन शुल्क आकारणीत केलेल्या सुधारणांमुळे मोठी वाढ अपेक्षित.
- ❖ महसुलातील वाढीमुळे महसुली अधिक्य गाठता आले.

आरोग्य, शिक्षण व पोषण :

- ❖ आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी रुपये २४१.९५ कोटी तसेच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासाठी रुपये १६६ कोटी.
- ❖ ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एक्स-रे व ईसीजीची सुविधा तसेच ग्रामीण रुग्णालयामध्ये रक्तपेढीची सुविधा यासाठी रुपये २४ कोटी.
- ❖ राज्यातील वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांचे बांधकामासाठी भरीव तरतूद.
- ❖ ससून चिकित्सालय, पुणे - रुपये २०.५० कोटी.
- ❖ शासकीय महाविद्यालय, नांदेड - रुपये ८.३३ कोटी.
- ❖ कॅन्सर चिकित्सालय, औरंगाबाद - रुपये ५.४३ कोटी.
- ❖ घाटी चिकित्सालय, औरंगाबाद - रुपये २५ कोटी.
- ❖ कस्तुरबा कॅन्सर हॉस्पिटल, वर्धा - रुपये सहा कोटी.
- ❖ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील नवीन ग्रंथालय इमारत बांधकाम - रुपये दोन कोटी.
- ❖ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील इमारत बांधकाम यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल.
- ❖ राज्यातील बालकांना शिक्षणासाठी राज्य हिस्सा रुपये १,२८० कोटी.
- ❖ सर्व शिक्षा अभियान रुपये ७८० कोटी.
- ❖ राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान रुपये ५०० कोटी.
- ❖ पूरक पोषण आहाराच्या दरात प्रतिदिन, प्रतिलाभार्थी रुपये एकने वाढ, यासाठी रुपये २११ कोटी अतिरिक्त तरतूद.
- ❖ बालकामगार निर्मूलनासाठी रुपये १६ कोटी.
- ❖ अल्पसंख्याक समाजातील मॅट्रिकपूर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी रुपये ४८ कोटी.
- ❖ अल्पसंख्याक विकासासाठी रुपये २७५ कोटी.
- ❖ तंत्रशिक्षण बांधकामासाठी रुपये ९० कोटी.

### पाणीपुरवठा :

- ❖ राज्यातील ८,३०० गावे/वाड्यांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत सुमारे रु. ७०० कोटींची तरतूद.
- ❖ महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत पाणीपुरवठा व मलनिस्सारण योजनांसाठी भरीव तरतूद.
- ❖ कोल्हापूर, जालना व अमरावती शहरांच्या नागरी पाणीपुरवठा व मलनिस्सारण योजनांसाठी रुपये १०० कोटी.
- ❖ पर्यावरण संतुलित ग्रामविकास अभियान या लोकाभिमुख व महत्त्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत थेट ग्रामपंचायतींना अनुदान यासाठी रुपये २०० कोटी.

### रस्ते विकास, ऊर्जा, उद्योग :

- ❖ राज्याच्या रस्ते विकासासाठी रुपये २,७४९ कोटींचा भरीव नियतव्यय.
- ❖ खासगीकरणांतर्गत चौपदरीकरणाच्या प्रकल्पासाठी वर्धनक्षमता तफावत निधी रुपये १५० कोटी.
- ❖ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास रुपये १५० कोटींचा नियतव्यय.
- ❖ राज्य भारनियमनमुक्त करण्यासाठी, विविध प्रकल्पांसाठी पायाभूत सुविधा यासाठी रुपये २,३०० कोटी.
- ❖ ग्रामपंचायतींना सौरऊर्जेच्या साह्याने सामुदायिक अभ्यासिका स्थापन करण्याच्या कार्यक्रमासाठी राज्यातील ४,४३५ गावांसाठी रुपये ७५ कोटी.
- ❖ वीजनिर्मिती केंद्र असणाऱ्या शहरांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विजेवर कर/ शुल्काच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाईल. चंद्रपूर शहराच्या विकासासाठी रुपये २५० कोटीचा तीन वर्षांचा आराखडा.
- ❖ सामूहिक प्रोत्साहन योजना प्रकल्पासाठी रुपये ४०० कोटी.
- ❖ नवीन वस्त्रोद्योग धोरणासाठी रुपये १०० कोटी.
- ❖ यंत्रमाग वीज अनुदानासाठी सुमारे रुपये ५०० कोटी.

अनुसूचित जाती/जमाती कल्याण :

- ❖ अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी घरकुल योजनेकरिता रुपये ८०० कोटी.

पान १४ वर ▶

## राज्य अर्थसंकल्प २०११-१२ ठळक वैशिष्ट्ये

▶ पान १३ वरुन

- ❖ यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती या समाजातील दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना घरे यासाठी रुपये २० कोटी.
- ❖ शासकीय वसतिगृह बांधकामासाठी रुपये १३५ कोटी.
- ❖ आश्रमशाळा बांधकामासाठी रुपये १९६ कोटी.
- ❖ सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीसाठी सुमारे २२५ कोटी.
- ❖ बायोमेट्रिक स्मार्ट कार्डच्या वापरासह लाभार्थ्यांना विविध विशेष सहायक योजनांच्या अनुदानासाठी रुपये ३८० कोटी.

### पर्यटन व सांस्कृतिक कार्य

- ❖ पर्यटनविषयक राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी व प्रचालनासाठी रुपये २५ कोटी.
- ❖ अष्टविनायक मंदिर विकासासाठी रुपये दहा कोटी.
- ❖ कोल्हापूर येथे चित्रनगरीसाठी रुपये दहा कोटी.
- ❖ किल्ले विकासासाठी रुपये २० कोटी.
- ❖ कोकण किनारपट्टीवरील बीच सुरक्षा यंत्रणेसाठी रुपये दहा कोटी.
- ❖ व्याघ्र प्रकल्प पर्यटनासाठी रुपये २५ कोटी.
- ❖ गोरेवाडा व गोरेगाव प्राणी संग्रहालयासाठी रुपये २८ कोटी.
- ❖ तीर्थक्षेत्र विकास विशेष आराखड्याअंतर्गत राज्यातील विविध तीर्थक्षेत्रांसाठी रुपये १७५ कोटींची भरीव तरतूद.

### गृह विभाग :

- ❖ सुमारे ६००० पोलिस कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान उपलब्ध होणार. यासाठी रुपये ११५ कोटी.
- ❖ मुंबईच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी सीसी टीव्ही यंत्रणा.
- ❖ विधान भवन सुरक्षा व्यवस्थेसाठी रुपये पाच कोटी.

### प्रशासकीय यंत्रणेचे बळकटीकरण :

- ❖ महसूल क्षेत्रीय स्तरावरील तहसील व प्रशासकीय इमारतींच्या बांधकामासाठी, शासकीय गोदाम बांधकामासाठी व न्यायालयाकरिता पायाभूत सुविधा यासाठी रुपये ३००,८५ कोटींची भरीव तरतूद.
- ❖ ई-गव्हर्नन्ससाठी रुपये ४० कोटी.

### मराठी भाषा विभाग :

- ❖ मराठी भाषेच्या समृद्धीसाठी स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना.

विधान मंडळ अमृतमहोत्सव :

- ❖ महाराष्ट्र विधान मंडळ अमृतमहोत्सवी सोहळा रुपये सात कोटी.
- ❖ विधान भवन, मुंबई, नागपूर व मॅजेस्टिक आमदार निवास, मुंबई यांचे नूतनीकरण यासाठी रुपये २५ कोटी.

### विक्रीकरात विक्रमी वाढ

- ❖ विक्रीकराच्या महसुलात विक्रमी वाढ. मागील वर्षाच्या तुलनेत २६ टक्क्यांनी वाढ.
- ❖ हवाला व्यवहारातील दोषींच्या शिक्षेत वाढ.

## 'दौलत'कडून शेतकऱ्यांचे
# ४८ कोटी येणे

### हेमरस, नलवडेही आघाडीवर : कायदेशीर कारवाईचा 'स्वाभिमानी'चा इशारा

चंदगड, ता. १९ : चालू हंगामातील ४३ कोटी ९९ लाख ११ हजार आणि गेल्या हंगामातील चार कोटी मिळून दौलत कारखान्याकडे सुमारे ४८ कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे देणे थकीत आहे. नव्याने सुरू झालेला हेमरस आणि चौथा हंगाम साधणारा नलवडे शुगर्सही याच वाटेवर आहे. साखर कारखानदारी कायद्याचे उल्लंघन करून एवढी मोठी रक्कम थकीत ठेवण्यात काय 'अर्थ' लपला आहे असा प्रश्न करून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विभागीय अध्यक्ष राजेंद्र गड्यान्नावर यांनी कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

चालू हंगामात १५ मार्चपर्यंत सव्वा दोन लाख टन उसाचे गाळप केले आहे. २ लाख ६३ हजार साखर पोत्यांचे उत्पादन झाले असून १२.४५ साखर उतारा आहे. नियमानुसार ऊस तोडल्यापासून चौदा दिवसांत संबंधित शेतकऱ्याच्या खात्यावर पैसे जमा करायला हवेत; परंतु अशा प्रकारचे पाच हप्ते पूर्ण होत आले तरी कारखान्याने फुटकी दमडीही शेतकऱ्याच्या हातावर ठेवलेली नाही. चालू हंगामातील रक्कम ४३ कोटी ९९ लाख ११ हजार आणि गतवर्षीची चार कोटी रुपये मिळून सुमारे ४८ कोटी रुपये रक्कम थकीत आहे. हेमरस कारखान्यानेसुद्धा जानेवारीनंतर अद्याप बिल दिलेले नाही. त्यांच्याकडून सुमारे दीड लाख टन गाळप झाले आहे. नलवडे शुगर्सने दीड लाख टन गाळप केले असून हंगाम प्रारंभावेळी दोन हजार रुपये दर जाहीर केला होता. प्रत्यक्षात अठराशेनेच बिले अदा केल्याने दोनशे रुपयांप्रमाणे सुमारे चार कोटींचा फरक लागत असल्याचे श्री. गड्यान्नावर यांनी सांगितले. कारखाना सुरू व्हावा हा उदात्त हेतू ठेवून संघटनेने प्रतिसाद दिला. परंतु, कारखाना चालवला म्हणजे दिव्य केले या आविर्भावात तासगावकर आणि गोपाळराव पाटील यांनी शेतकऱ्यांना वेठीला धरू नये, असा इशारा श्री. गड्यान्नावर यांनी दिला.

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमिवर सेवा संस्थाकडून कर्ज उचलायचे झाल्यास मागील थकबाकी असल्याने शेतकरी अडचणीत आहेत. त्यांचे अर्थकारण कोलमडणाऱ्या या तीनही कारखान्यांवर कायदेशीर कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# कारखाने बंद, बेरोजगारी वाढली

मुंबई(प्रतिनिधी): महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालात राज्यातील सध्याच्या स्थितीची वस्तुस्थिती मांडण्यात आलेली आहे. यामध्ये कारखाने बंद पडण्याचे प्रमाण वाढत असून बेरोजगारीचा आलेखही उंचावत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य विधिमंडळाच्या मुंबईत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात २०११ - ११ या वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्यात आला. त्यात गतवर्षीच्या तुलनेत राज्याच्या स्थूल उत्पन्नात १६.६ टक्के वाढ अपेक्षित असून, ते नऊ लाख कोटींच्या घरात जाईल. यंदा अवकाळी पाऊस व अन्य कारणामुळे बळीराजाचे नुकसान झाले असले तरीही शेती व संलग्न क्षेत्रातील वाढ ३.१ वरून १५.५ टक्क्यांवर जाणार असून, उद्योग क्षेत्रातील वाढ ९.१ टक्क्यांवरून १०.९ टक्के अपेक्षित असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

गुंतवणुकीत मागे

औद्योगिक गुंतवणुकीत गेल्या १० वर्षात महाराष्ट्राला मागे टाकल्याची कबुली सरकाने दिली आहे. ८ लाख ५९ हजार कोची रूपयांची गुंतवणूक गुजरातमध्ये झाली आहे. तर महाराष्ट्रात ६ लाख ९५ हजार कोटी रू. गुंतवणूक झाली आहे. त्याचेवळी राज्यातील ९१९ कारखाने बंद पडले आहेत अथवा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. परिणामी



बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढत असून नोंदणीकृत बेरोजगारांची संख्या २६ लाख ८३ हजार एवढी आहे, त्याम ध्ये ६लाख ६० हजार महिला आहेत.

वीज क्षेत्रात सुधारण

अनेक वर्षे लोडशेडिंगच्या विळख्यात सापडलेल्या राज्याची वीजटंचाईतून सुटका होत असल्याचे चित्र असून डिसेंबर २०१० अखेर राज्यात ५५ हजार ७७ दशलक्ष किलोवॅट तास वीज निर्मिती झाल्यामुळे वीज क्षेत्रात अमुलाग्र सुधारणा असल्याचे स्पष्ट झाले. राज्यातील ६५ नागरी भागांपैकी ६२ भागांमध्ये एक कोटीपेक्षा अधिक ध्वनी झोपडपट्टीत राहत आहेत. त्याचवेळी शहरी श्रीमंतीही झपाट्याने वाढत असून मोटारींची संख्या २५लाख ६१ हजार आहे.

महागाईत वाढ

महागाईच्या झळांनी सर्वसामान्य माणूस होरपळला असून महागाईत ११.२ टक्क्यांवरून १२ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. महागाईपासून जन-तेला दिलासा देण्यासाठी माफक दरात जीवनाश्यक वस्तू आणि सेवांसाठी चालू आर्थिक वर्षात ५३३० कोटींचे अर्थसहाय्य देण्यात आले. त्यात शेतीपंप, यंत्रमागासाठी सवलतीच्या दरातील वीज पुरवठ्यासाठी सरकारने वीज कंपनीला २२८१ कोटींची सबसिडी दिली.

अन्नधान्य उत्पादन वाढणार

अन्नधान्याच्या उत्पादनात २२.९ टक्के वाढ अपेक्षित असून, गतवर्षी १२५.८५ लाख मे. टन उत्पादनाच्या तुलनेत १५४.६३ लाख मे. टन होईल. तेलबिया. कापूस आणि ऊस यांचे उत्पादन अनुक्रमे ४८.८४ लाख मे.टन ८९.३८ लाख गासाड्या आणि ७९३ लाख मे. टन अपेक्षित आहे.

प्राथमिक शाळांतील उपस्थिती

प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांतील मुलांच्या उपस्थितीत कोणत्याही एका दिवशीची अनुक्रमे ९१.५ आणि ९२.४ टक्के असल्याचे असर २०१० अहव-ालाचा हवाला देत नमूद करण्यात आले आहे. ग्लोबल वॉर्मिंग समस्येची दखल घेऊन यासाठी ठोस कृती आराखडा तयार करण्यासाठी द एनर्जी अँड रिस-ोसेर्स इन्स्टिट्यूट या संस्थेवर सामजंस्य करार करण्यात आल्याचे अहवालात म्हटले आहे.

# रासायनिक खते अजूनही सरकारी नियंत्रणाखाली

लोकसंख्या वाढत आहे, त्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढत राहिले पाहिजे व ते स्वस्त दरात मिळायला हवे. नवे शोध लागले, तंत्रज्ञान मिळाले किंवा शेती करण्याच्या पध्दतीत काही क्रांतीकारी बदल झाले व कमी खर्चात उत्पादन अनेकपटीने वाढवता आले तर या समस्येतून सुटण्याचा मार्ग मिळू शकतो. अन्यथा खतांसाठी अनुदान द्यायचे पण अन्नधान्याचे भाव वाढू द्यायचे नाहीत हे धोरण पुढे राहील व शेती कारण कधीच फायदेशीर होणार नाही.

जगाची लोकसंख्या १९६० साली ३०० कोटी होती, ती जून २०१० च्या सुमारास ६८५ कोटींवर गेली. याचा अर्थ दर १० वर्षात ७० कोटीने, म्हणजे दरवर्षी सुमारे सात कोटीने जगाची लोकसंख्या वाढतो. अर्थात जास्तीच्या लोकांच्या अन्नपाण्याची सोय नव्याने करावी लागते. भारताचा विचार केला तर,लोकसंख्या १९४७ सालच्या ३५ कोटींवरून २०१० साली सुमारे ११५ कोटींवर गेली आहे. याचा अर्थ देशात दरवर्षी साधारण दीड कोटी खाणारी तोंडे वाढतात. तितके अन्नधान्याचे पीक दरवर्षी वाढालयाच हवे, नाहीतर त्याचा तुटवडा भासणार, नवे तंत्रज्ञान, पिकांच्या नव्या जाती, बियाणे, कीटकनाशके, यांचा वापर करून दर हेक्टरी उत्पादन वाढवणे, तसेच खतांच्या सहाय्याने उत्पादन वाढविणे, या उत्पादनाची किंमत शिवाय स्वस्त हवी कारण अन्नधान्य ही जीवनाश्यक बाब आहे.

१९५०-५१ नंतर जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न झाले. व तशी वाढही झाली. पण जसजसे औद्योगिकीकरण वाढत आहे, तशी लागवडीखालील जमीनही कमी झाली. सिंचनाच्या सोयीतही आता फारशी वाढ होत नसून एकूण उत्पादनात जी वाढ होत आहे, ती प्रती हेक्टरी उत्पादन वाढल्यामुळे झाली व होत आहे. देशात जी भाकड जमीन आहे, ती लागवडीखाली आणण्याची कधीतरी चर्चा होते, काही पक्ष, सामाजिक कार्यकर्ते तशी मागणी करतात. पण त्यादिशेने ठोस काही कार्यवाही केली जात नाही. पिकांच्या वाढीसाठी १६ आवश्यक घटक असतात. त्यापैकी कार्बन, ऑक्सिजन व हायड्रोजन हे घटक हवेत असतात, त्यामुळे यांचा खतांमध्ये समावेश नसतात. नायट्रोजन, फॉस्फरस व पोटॅशिअम हे खतांचे तीन प्रकार. त्यापैकी युरीया हा नायट्रोजनयुक्त खत असून त्याबाबतीत देश स्वयंपूर्ण आहे. फॉस्फेटिक खतांपैकी देशात ५० टक्के उत्पादन होते. पण या उत्पादनासाठी आवश्यक कच्चा माल व काही घटक मात्र बाहेरून आयात करावे लागते. पोटॅशचा साठा देशात नसल्याने याबाबत आपण पूर्णपणे आयतीवरच अवलंबून रहावे लागते. देशात रासायनिक खतांच्या उद्योगाची सुरवात १९०६ पासून झाली. आज देशात ५६ मोठे खत कारखाने आहेत. त्यापैकी ३० युरीयाते उत्पादन करतात. २१ डीएपी, ५ नायट्रोजनच्या प्रकाराती खतांचे उत्पादन करतात. सन ५१ - ५२ साली देशात प्रती हेक्टर १ किलोपेक्षा कमी होता, तो आता प्रती हेक्टर १२९ साली झाला आहे. खतांचे दर काय असावेत हे सरकारच ठरवते. देशात आता बरीत संपन्नता आहे व काही लोकसंख्येची क्रयशक्ती तर खपूच वाढलेली आहे. असा लोकांसाठी अन्नधान्याच्या किमती वाढल्या तर काही फरक पडणार नाही. शेतकरी तरला तरच देश तरणार आहे.

# ४०५ भ्रष्ट 'बाबू' तत्काळ निलंबित

मुंबई, ता. २१ : आत्महत्याग्रस्त विदर्भातील सहा जिल्ह्यांत शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या पॅकेजमध्ये अपहार केल्याचा ठपका असलेल्या ४०५ अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची घोषणा आज विधानसभेत करण्यात आली. कृषिमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केलेली ही कारवाई राज्याच्याच नव्हे, तर देशाच्या इतिहासात पहिलीच असल्याचे मानले जात आहे.

भाजपचे आमदार हरीष पिंपळे यांनी या घोटाळ्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. शेतकऱ्यांच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्या अधिकाऱ्यांना सरकारने तीन वर्षे पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचा संताप या वेळी आमदारांनी व्यक्त केला. युतीच्या आमदारांनी या भ्रष्ट अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्याची आग्रही मागणी विधानसभेत लावून धरली. यामुळे कृषिमंत्री विखे-पाटील यांनी हा धाडसी निर्णय घेतला.

दरम्यान, सभागृहाच्या बाहेर प्रसारमाध्यमांशी बोलताना गंभीर स्वरूपाचे गुन्हे असल्यास ५० अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित करण्यात येणार असून, इतर अधिकाऱ्यांच्या बाबतीत सर्व प्रक्रिया तपासून महिनाभरात निलंबनाचे आदेश काढले जातील, अशी माहिती विखे-पाटील यांनी दिली.

दिवंगत वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनअंतर्गत विदर्भातील आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांतील ६० हजार शेतकऱ्यांना विविध शेतीसुधारणांसाठी प्रत्येकी २५ हजार रुपये याप्रमाणे १५० कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला होता. यापैकी १४७.४९ कोटी निधी खर्च झालेला आहे; तर राज्य सरकारने डिसेंबर २००५ मध्ये या सहा जिल्ह्यांकरिता १०७५ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. या कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानुसार राज्य सरकारने १३ डिसेंबर २००७ रोजी डॉ. गोपाल रेड्डी यांची चौकशी समिती नेमली होती. या समितीने १ सप्टेंबर २००८ रोजी सरकारला अहवाल दिला. डॉ. रेड्डी समितीने ४०५ अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली असल्याची कबुली कृषिमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधानसभेत दिली.

शेतकऱ्यांचा निधी हडपणाऱ्या अधिकाऱ्यांना चौकशी समितीने दोषी ठरविले असतानाही राज्य सरकारने त्यांना गेली तीन वर्षे पाठीशी घातल्याचा आरोप विरोधी आमदारांनी केला. या अधिकाऱ्यांवर एका महिन्यात योग्य ती कारवाई करण्यात येईल, त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात येतील. असे आश्वासन विखे पाटील यांनी दिले.

मात्र विरोधी सदस्यांनी अध्यक्षांच्या समोरील रिकाम्या जागेत जाऊन सरकारविरोधी जोरदार घोषणाबाजी केली. भ्रष्ट अधिकाऱ्यांचे निलंबन झालेच पाहिजे, अशी आग्रही मागणी करत विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडले. सत्ताधारी आमदारांनीही या मागणीचे समर्थन केले. त्यामुळे विखे पाटील यांनी डॉ. रेड्डी समितीने दोषी ठरविलेल्या ४०५ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येत असल्याची घोषणा विधानसभेत केली.

# ब्रम्हनाळमध्ये वीज कर्मचाऱ्यांना हाकलले

नांद्रे : शेतकऱ्यांनी त्वरीत वीज बिल भरा अन्यथा वीज पुरवठा खंडीत करून असे पुकारत असलेल्या वीज वितरण कंपनीच्या वसुली गाडीस ब्रह्मनाळ ता. पलूस येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हुसकावून दिले.

सध्या मार्च एडिंग सुरू आहे. त्यामुळे वीज वितरण कंपनीने थकबाकीची वसूली जोमात सुरु आहे वसगडे, खटाव व ब्रह्मनाळ परिसरात वीज वितरण कंपनीने वसूली मोहीम राबविलेली आहे. शेतीला ८ तासाऐवजी १० तास वीज द्या अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. आज ब्रह्मनाळ येथे वीज वितरण कंपनीची गाडी आल्यावर स्वाभिमानी युवा आघाडीचे संदीप राजोबा व त्यांच्या कार्यत्यांनी हाडी अडवून शेतीला १० तास वीज पुरवठा झाल्याशिवाय अजिबात वसूली करायची नाही असे सांगत वीज वितरण कपंनीच्या कर्मचाऱ्यांना येथून परत पाठवून दिले. याबाबत बोलताना संदीप राजोबा म्हणाले, शेतीला १० तास वीज द्या अशी आमची मागणी आहे. पुरेशी वीज दिली जात नाही. यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे वीज वितरण कंपनीची गाडी हुसकावून दिलेली आहे. १० तास वीज पुरवठा झाल्याशिवाय परिसरात अजिबात कारवाई करू देणार नाही.

# राज्याची आर्थिक पाहणीः एक दृष्टीक्षेप

मुंबईः देशाच्या तुलनेत राज्याचा साक्षरता दर १९.९ टक्क्यांहून अधिक म्हणजे ७६.९ टक्के

१) ऑगस्ट २०१० अखेर १ कोटी ९५ लाख ४०७ कोटींची औद्योगिक गुंतवणूक. ८ हजार ३२२ कार्यान्वित प्रकल्प

२) सप्टेंबर २००९ ते ऑगस्ट २०१० दीड लाख कोटींच्या ७९६ प्रकल्पांना मान्यता. यापैकी ८६७६ कोटींचे ३६ प्रखल्प कार्यान्वित. त्यातून ९ हजार ४५८ रोजगार निर्मिती.

३) राज्यातील स्थापित वीज निर्मिती क्षमतेत २.९ टक्के वाढ ३१ डिसेंबर २०१० अखेर १९ हजार १६ मेगावॉट

४) नोठ्या बंदरातील वाहतुकीत वाढ,मुंबई पोर्ट ट्रस्टची वाहतूक क्षमता ४७४ लाख टनांवरून ४९७ लाख टन तर जेएनपीटीची वाहतूक ५७२.९६ लाख टनांवरून ६०७.६३ लाख टन

५) महाराष्ट्र देशातील वाईन निर्मितीत अव्वल क्रमांकावर देशात एकूण ३८ पैकी३६ वाईनरी राज्यात आहे. ६.२ दशलक्ष लीटर वाईन उत्पादनात राज्याचा वाटा ८७ टक्के.

६) अपात्र, बनावट रेशनकार्ड विरोधी मोहिमेत २०१० वर्षात १२ लाख ७६ हजार रेशनकार्ड रद्द. त्यात केशरी कार्डांची संख्या १० लाख ३० हजार तर बीपीएलच्या पिवळ्या कार्डाची संख्या दीड लाख.

७) राज्यात २००९-१० अखेर ३१ हजार ६४५ सहकारी दूध संस्था व संघ होते. त्यापैकी सुमारे ४३ टक्के संस्था तोट्यात आहेत.

८) खासगी परवानाधारक सावकारांच्या संख्येत ११.३ टक्के वाढ

९) दुचाकी, मोटार वाहनाच्या संख्येत मोठी वाढ. राज्यात १ जानेवारी २०११ रोजी एकूण वाहनसंख्या १७०.३० लाख

१०) ड्रॉयव्हिंग लायन्सच्या संख्येतही १४ टक्के वाढ. एकूण ड्रायव्हिंग लायसन्सच्या संख्येतही १४ टक्के वाढ. एकूण ड्रायव्हिंग लायसन्स २०१.३ लाख लर्निंग लायसन्सती संख्या ३१.३७ लाख

## मोबाईल वाढले लॅल्डलाइन घटले

राज्यात मोबाइलधारकांची संख्या सात कोटींवरून ८ कोटी ६३ लाखांच्या घरात गेली असून लॅण्डलाइन फोन वापरणाऱ्यांची संख्या गतवर्षीच्या तुलनेत घटली आहे. ती ५९.५५ लाखांवरून ५८.६३ लाख झाली. इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात अधिक.

# शिवकालीन सर्व किल्ल्यांच्या डागडुजीसाठी लवकरच निधी

जयसिंगपूर (प्रतिनिधी)ः छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सर्व किल्ल्यांच्या डागडुजीसाठी लवकरच निधी उपलब्ध करू असे ठोस आश्वासन केंद्रीय पर्यटन मंत्री सुबोध कान्त सहाय यांनी लोकसभेत बोलताना दिली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी प्रश्नोत्तराच्या तासात पश्चिम महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या व पर्यटन विकासासाठी कोणती तरतूद केली आहे. असा प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर पर्यटनमंत्र्यांनी वरील आश्वासन दिले.

केंद्रीय मंत्री सुबोधकांत सहाय म्हणाले की, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ल्यांना व तिर्थक्षेत्रांना विशेष महत्त्व आहे. आमच्या अनेक योजना २००४ ते २००९ पर्यंत तशाच पडून आहेत. सन २०११ - १२ मध्ये पर्यटन स्थळासाठी विशेष योजना राबवत आहोत. यामध्ये राज्य सरकारलाही समाविष्ठ करून घेण्यात येईल. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील किल्ल्यांचा जरूरपणे समाविष्ठ करून घेऊ. अशी माहितीही यावेळी त्यांनी दिली.


# भरत बँकेच्या अध्यक्षपदी पै. विठ्ठल मोरे

जयसिंगपूर (प्रतिनिधी)ः येथील श्री भरत अर्बन को ऑ. बँकेच्या अध्यक्षपदी पै. विठ्ठल मोरे तर उपाध्यक्षपदी अशोक रूणवाल यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. सन २०११ ते १६ सालासाठी निवडणूक बिनविरोध झालेली होती. सहाय्यक निबंधक एम. एल. माळी यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड पार पडली. यावेळी बँकेचे संस्थापक संचालक डॉ.जे. जे. मगदू म यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. श्रीवर्धन पाटील, अजित पाटील आदी उपस्थित होते.



# ऊस पिकासाठी जमिनीची निवड

पीक-पाणी
डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५



जमिन ही शेतकऱ्यांची धनसंपत्ती असल्याने जमिनीची सुपिकता कायम टिकवणे व तिची उत्पादकता वाढविणे हे प्रत्येक शेतकऱ्याचे मुख्य कर्तव्य आहे. त्या करीता जमिनीत असणाऱ्या उपलब्ध अन्नद्रव्याची महिती व ती किती प्रमाणात आहेत. याबाबत माहिती करून घेऊन उसाला खत देणे जरूरीची आहे. शेतकरी जमिनीची निवड व जमिनीच्या व्यवस्थापनाकडे पाहिजे असे लक्ष दिले जात नाही. म्हणून ऊस उत्पादकता कमी होत आहे हे त्यांच्या लक्षात येत नाही. त्याकरिता जमिनीची निवड याकडे लक्ष देणे अगत्याचे आहे. ऊस हे पीक शेतात फारकाळ उभे असते. व जमिनीतून मोठ्या प्रमाणात अन्नद्रव्याचे शोषण करीत असते. म्हणून ऊस लागवडीत जमिनीचे स्थान महत्वाचे असते, हे विसरून चालणार नाही. अधिक ऊस उत्पादनाच्या दृष्टीने जमिनीची निवड व नियोजन याला फार महत्व नाही.

जमिनीची भौतिक व रासायनिक गुणधर्माचा अभ्यासक्रम ऊस पिकासाठी कोणत्या जमिनी अयोग्य आहेत त्या ठरविणे अधित जरूरीचे आहेत. ऊस पिकासाठी चांगला निचरा होणाऱ्या १ ते २ मिटर खोलीचे ०.४ ते ०.५ टक्के उताराच्या मध्यम पोयट्याच्या ५० टक्के पेक्षा जादा जलधारण शक्ती असणाऱ्या जमिनी योग्य आहेत. उसासाठी जमिनीचा सामु ६.५ ते ८.५, क्षारचे प्रमाण ०.५ टक्के पेक्षा कमी चुनखडी प्रमाण १० टक्के पेक्षा कमी व उपलब्ध अन्नद्रव्याचा साठा भरपूर असणाऱ्या असाव्यात.

ऊस पिकाचे चांगले उत्पादन काढण्याच्या दृष्टीने मध्यम काळी तसेच नदीकाठच्या गाळाच्या जमिनी चांगल्या म्हणून समजावेत. नदीकाठच्या गाळाच्या जमिनीचे व्यवस्थापन चांगले केल्यास या जमिनी ऊस उत्पादनाच्या दृश्टीने फारच चांगल्या आहेत. या जमिनीचे जैविक, भौतिक व रासायनिक गुणधर्म उत्तम असून उसाचे मुळे खोलवर जातात. त्यामुळे उसाची वाढ व जाडी अधिक होते. जमिन चांगल्या निचरा होत असल्याने खारवटस अथवा चोपन होण्याची शक्यता फारच कमी असते. मध्यम काळ्या व मध्यम खोलीच्या जमिनीत उपलब्ध नत्र व पालाशचे प्रमाण मध्यम ते जास्त असते. तसेच सेंद्रिय कार्बचे प्रमाण अधिक असते. या जमिनीत जलधारण शक्ती चांगली असते. व पाण्याचा निचरा मध्यम प्रमाणात होतो.

तसेच ऊस, लालसर, तांबूस, करड्या ५० ते १० से. मी खालीच्या जमिनी वापरून उसाचे चांगले उत्पादन मिळवणे शक्य आहे. या जमिनीत पाण्याचा चांगला निचरा होत असल्यामुळे जमिन खराब होत नाहीत. या जमिनीत ऊस उगवणीचे प्रमाण चांगले असते. व अंतर मशागत करणे सोपे असते. चांगले ऊस उत्पादन घेण्याच्या दृष्टीने जास्ती चुनखडीच्या जमिनी, गावठाणाच्या एकदम पांढऱ्या, क्षारयुक्त चोपण खारवट चापण, चढउताऱ्याच्या व मुरमाड जमिनी शक्यतो निवडू नयेत. जमिनीच्या भौतिक तसेच रासायनिक गुणधर्मास अनुसरून ऊस लावगड करावी.

वर नमूद केल्याप्रमाणे आपली जमिन कशाप्रकारची आहे व त्या जमिनीची कशारप्रकारे काशजी घ्यावी. हे आपल्याला सजताच त्याप्रमाणे जमिनीचे नियोजन केल्यास अधिक ऊस उत्पादन मि ळवून जमिन अधिक कालावधीपर्यंत सुपीक राहण्यास मदत होते. तरी शेतकऱ्यांनी याची नोंद घेऊन ऊस उत्पादन वाढवावेत.

